Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# सिंधुदुर्ग जिल्हयातील पशुपालन : एक अभ्यास

**डॉ. विजय बैसाणे**
संशोधक मार्गदर्शक व विभाग प्रमुख
दगडोजीराव देशमुख कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय
वाळुज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

## सारांश

मानव उदरनिर्वाहासाठी प्राण्यांची शिकार करत असे. कालांतराने शेतीस सुरूवात होत गेली. आणि तो एकाच स्थायीक होऊन शेती करू लागला. तसेच शेतीपुरक व्यवसाय म्हणून पशुपालन करू लागला. पशुपालनातून तो दुध, मांस, लोकर याचा उपयोग आपल्या जीवनामध्ये करू लागला. तसेच शेतीच्या मशागतीसाठीही प्राण्यांचा उपयोग करू लागला. शेतीच्या मशागतीचे कामात बैल, रेडा, घोडा इत्यदींचा उपयोग घेऊ लागला. सुरूवातीस शेती व पशुपालन हे उदर निवार्हासाठीच केली जायचे. हळुहळु त्यास व्यावसायीक स्वरूप प्राप्त झाले. शेतीतून गहू, ज्वारी, बाजरी, मका, कडधान्य, नगदी पिके यापासुन शेतकऱ्यास अर्थाजन होते. तसेच पशुपालनातून दुध, मांस, लोकर, कातडी इत्यादींचे उत्पादन घतले जाते. यातूनही शेतकऱ्यांचा आर्थीक फायदा होऊ लागला. जागतीक पातळीवर दुध, दुग्धजन्य पदार्थ, मांस, कातडी, अंडी इत्यादींना प्रचंड मागणी आहे. आयात निर्यातीद्वारे पशु उत्पादनाची मोठ्या प्रमाणात देवान घेवाण होते. यामुळे पशुपालनास अंतरराष्टअय महत्व प्राप्त झाले आहे.

**बीज** संज्ञा : पशुपालन, पशुधन, पशुसंख्या

**प्रस्तावना** :

पशुपालन, मत्स्यपालन हे भारतासारख्या कृषिप्रधान देशामध्ये शेतीस जोड व्यवसाय म्हणून मोठ्या प्रमाणात केले जाते. भारतात दुध, मांस, अंबडी, कातडी, लोकर या स्वरूपाचे उत्पादन पशुपालनातून व्यावसायीक दृष्टीकोणातून घेतले जाते. भारत सरकार व राज्यसरकार द्वारे पशुपालनासाठी आर्थिक सहाय्य केले जाते. जसे. शेतकऱ्यांना पशुधन खरेदी करण्यासाठी निधीची मदत, बचत गटांना पशुपालनासाठी बँकेमार्फत निधी उपलब्ध करण्यात येतो. तसेच पशुवैद्यकिय संस्था, पशुवैद्यकिय विद्यापीठे यांच्या मार्फत पशुंचे जतन व संवर्धनासाठी शासकीय आरोग्यसुविधा उपलब्ध केल्या जातात. जनगनने प्रमाणे पशु गणणानही केली जाते. महाराष्ट्रात शेतकऱ्यांजवळ शेती उपयोगासाठी पशुपालन केल्या जाते. शहराजवळ असणाऱ्या गावांमध्ये पशुपालन करून शहरात दुग्ध, मांस, अंबडी इत्यादी स्वरूपाचा व्यावसाय केला जातो.

**आभ्यास क्षेत्र :**

कोकण विभागातील सिंधुदुर्ग हा एक महत्त्वाचा जिल्हा आहे. महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम किनारपट्टीचा दक्षिणेकडील भाग म्हणजे सिंधुदुर्ग जिल्हा होय. राज्याच्या ७२० कि.मी. किनारपट्टीपैकी १२१ कि.मी. किनारपट्टी जिल्हयाला लाभली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात प्रामुख्याने भात शेतीक केली जाते. याशिवाय नारळ, सुपारी, काजु, अंबा, कोकम ही महत्त्वाची नगदी पिके मोठ्या प्रमाणशत घेतली जाते. समुद्र किणारा असल्या कारणामुळे मोठ्या खाड्यांमधून मासेमारी केली जाते. सिंधुदुर्ग जिल्हयाच्या पूर्वेस कोल्हापुर जिल्हा, दक्षिणेस कर्णाटक राज्यातील बेळगाव जिल्हा व गोवाराज्य, उत्तरेस रत्नागिरी जिल्हा तर पश्चिमेस अरबी समुद्र आहे.

या जिल्हयाचे दक्षीणोत्तर अक्षांस १५.३७ अंश, ते १६.४० अंश व पुर्व-पश्चिम रेखांश ७३.१९ अंश ते ७४.१८ अंश असे आहे. या जिल्हयाचे क्षेत्रफळ ५२०७ चौ.की. आहे. या जिल्हयात ८ तालुके आहे. या जिल्हयामध्ये वाघोटन, देवगड, करली, गडनदी, तिलारी व तेरेखोल या सहा मोठ्या नद्या आहे. या सर्व नद्या सहयाद्रीच्या डोंगर कपारीमध्ये उगम पाऊन अरबी समुद्राला मिळतात. सन २०११ च्या जनगनने नुसार जिल्हयाची लोकसंख्या ८४९६५१ ऐवढी आहे. त्यापैकी पुरूष ४१७३३२ व स्त्रीया ४३२३१९ अशी आहे.

जिल्हयाचे एकूण क्षेत्र ५०३९५० हेक्टर असून यापैकी जंगल व्याप्त क्षेत्र ११.३% आहे. पडीत जमिनीचे क्षेत्र १३.७३% ऐवढे आहे.

उदिष्टे :

1) सिंधुदुर्ग जिल्हयातील पशु पालनाचा अभ्यास करणे.
2) सिंधुदुर्ग जिल्हयातील पशुंच्या संख्येचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती व आधार सामग्री :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी जिल्हयातील द्वितीय स्वरूपाची माहिती संकलित करून जसे विविध शासकिय जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, मासिके, शासकिय संकेत स्थळे, यादवारे माहिती गोळा केली असुन सांख्यिकिय माहितीचे विश्लेषण करण्यासाठी तक्ते आलेख याचा वापर करण्यात आला आहे.

**विषय विवेचन :**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषि आणि पशुपालन यांना विशेष महत्त्व आहे. कृषि उत्पादनाबरोबरच शेतकऱ्यांना पशुपालनातुनही आर्थिक उत्पन्न मिळते. गायी, म्हशी यांचे पालन दुध उत्पादनासाठी केले जाते. शासनस्तरावरही पशुपालन करण्यासाठी प्रयत्न केले जातात. उच्च प्रतिचे पशुधन त्यांचे पालनपोषण, पशु आरोग्य या संदर्भात शासनस्तरावर मदत आणि सुविधा पुरविल्या जातात. पशुपालनासाठी कर्जस्वरूपात प्रशासन मदत करते. तसेच उच्चप्रतिच्या पशुंचे

वाटपही केल्या जाते. महाराष्ट्रातही गाय, म्हैस, शेळी, मेंढी, कोंबडी इत्यादी पालन केले जाते. सिंधुदुर्ग जिल्हयातही पशुंचे पालन केले जाते.


सिंधुदुर्ग जिल्हयातील पशुधन व कुकुटपक्षी

| अ.क्र. | तालुका | देशी/विदेशी संकरीत गायी व बैल | म्हशी व रेडे | मेंढ्या | बकऱ्या | घोडे व शिंगरे | इतर पशुधन (डुकरे, उंट, गाढव) | एकूण पशुधन | एकूण कोंबड्या | एकूण कुक्कुट पक्षी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | देवगड | २७८१७ | ५८०८ | ७ | २२५० | १ | ६ | ३५८८९ | ४६८४० | ५०२०४ |
| 2 | वैभववाडी | १२७३५ | २५०१ | ० | २१८५ | ५ | ० | १७४२६ | ४५३०३ | ४५८४५ |
| 3 | कणकवली | २९८९२ | ९२४९ | ४ | ३४६२ | ४ | ५४४ | ४३१५५ | १०६०७७ | १०८३७२ |
| 4 | मालवण | १८२४३ | ६९३८ | ० | ४७८४ | ० | १०० | ३००६५ | ६११०५ | ६१४०९ |
| 5 | वेंगुर्ला | ११७३२ | ४७२४ | ० | १५३५ | ० | २५७ | १८२४८ | ३६३११ | ३६३१९ |
| 6 | कुडाळ | २४९१६ | २०००१ | ० | ८१८८ | २ | २०७ | ५३३१४ | ११२९१९ | १४४९४८ |
| 7 | सावंतवाडी | १५६६६ | १३१५१ | ० | ४५७९ | ३ | ६१८ | ३४०१७ | ६४०१० | १८८००६ |
| 8 | दोडामार्क | ६४०९ | ४५६३ | ० | ११४२ | ० | ० | १२११४ | ३९०४८ | १३४०४८ |
|  | एकूण | १४७४१० | ६६९३५ | ११ | २८१२५ | १५ | १७३२ | २४४२२८ | ५११६१३ | ७६९१५१ |

*आधार - पशुगणना २०१२*

*स्त्रोत : सिंधुदुर्ग जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन 2020*

आलेख क्र.१ - सिंधुदुर्ग जिल्हयातील एकूण पशुधन




वरील आकडेवरून असे स्पष्ट होते की, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये एकूण पशुधनापैकी देशी व विदेशी संकरीत गाई व बैल यांची संख्या एकूण १४७४१० आसुन सगळ्यात जास्त कणकवली

तालुक्यात २९८९२ असुन सर्वात कमी दोडामार्ग तालुक्यात ६४०९ ऐवढे आहे. तर एकूण म्हशी व रेडे यांची जिल्हयातील संख्या ६६९३५ ऐवढी आहे. कुडाळा तालुक्यात २०००१ ऐवढी आहे. तर सर्वात कमी वैभववाडी तालुक्यात २५०१ ऐवढे आहे. मेंढ्या देवगड व कणकवली तालुक्यात आहे. जिल्हयातील बकऱ्यांची एकूण संख्या २८१२५ ऐवढी आहे. कुडाळ तालुक्यात सर्वात जास्त ८१८८ तर दोडामार्ग तालुक्यात सर्वात कमी ११४२ ऐवढी आहे. जिल्हयात घोडे व शिंगरे व खेचर यांची संख्या १५ आहे. इतर पशुधन १७३२ आहे. जिल्हयातील एकूण पशुधन २४४२२८ ऐवढे आहे. सर्वात जास्त पशुधन कुडाळ तालुक्यात ५३३१४ तर सर्वात कमी दोडामार्ग तालुक्यात १२११४ ऐवढे आहे. जिल्हयातील कुकुटपक्षांपैकी कोंबडी ५११६१३ ऐवढी आहे. सर्वात जास्तव कुडाळ तालुक्यात ११२९१९ तर सर्वात कमी वेंगुर्ला तालुक्यात ३६३११ ऐवढे आहे. तर एकूण कुकुटपक्षी कोंबड्या, बदक, टर्की, कुकुटपालन केंद्रातील पक्षी आणि इतर कुकुटपक्षी यांची संख्या ७६९१५१ ऐवढी आहे. सर्वात जास्त सावंतवाडी तालुक्यात १८८००६ तर सर्वात कमी वेंगुर्ला तालुक्यात ३६३११ ऐवढी आहे.

## निष्कर्ष :

सिंधुदुर्ग जिल्हयातील पशुधन पाहता देशी-विदेशी संकरीत गाई व बैल यांची संख्या पशुधनामध्ये सर्वाधिक आहे. त्या खालोखाल म्हशी व रेडे यांची संख्या आहे. त्यानंतर बकऱ्या संख्या दिसून येते. तर मेंढ्यांची संख्या नगंन्य आहे. घोडे शिंगरे व खेचर व गाढव यांची संख्या काही तालुक्यात अत्यल्प आहे. इतर पशुधन संख्या ही कमी आहे. काही तालुक्यात तर इतर पशुधन नाही. कुकुटपक्षी सर्वच तालुक्यात आढळून येतात. कोंबड्या, बदके, टर्की इतर कुकुटपक्षी व कुकुटपालन केंद्रातील पक्षी सर्वच तालुक्यात आहेत.

## संदर्भ :

1) कृषि भूगोल, डॉ. सूर्यवंशी डी.एस., निराली प्रकाशन
2) पशुपालन व पशु चिकित्सा, ओमप्रकाश सक्सेना, डी.पी.बी. पब्लिकेशन
3) पशुपालन, डॉ. डी. के. ठाकूर, डिस्कवरी पब्लिसिंग हाऊन
4) व्यवहारीक पशुपालन, एस.बी. दुबे, ए.के. शिंदे, बी.एन. सिंह, सी.बी.एस. पब्लिशर ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स
5) सामाजिक आर्थिक समालोचन, सिंधुदुर्ग जिल्हा
6) संकेत स्थळ
a) मत्स्यपालन, पशुपालन, डेअरी मंत्रालय भारत सरकार, dasd.nic.in
b) पशुपालन विभाग महाराष्ट्र शासन, ahd.maharashtra.gov.in